# शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल

## नालंदा कुल

### महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी

## अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे गुरुवार दिनांक २८ नोव्हेंबर २०२४ रोजी **'महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी'पर** कार्यक्रम महाविद्यालयाच्या सरस्वती कक्षामध्ये आयोजित करण्यात आला. महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. नालंदा कुलाच्या मार्गदर्शक प्रा. बिजली दडपे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कार्यक्रमाच्या अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले आणि सर्व प्राध्यापकांनी दीपप्रज्वलन व सरस्वती प्रतिमा पूजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत श्रीमती मनीषा पांचाळ यांनी कार्यक्रमाचा उद्देश्य सांगितला. श्रीमती शोभा भांगे यांनी त्यांच्या भाषणामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार आणि कार्य अधोरेखित केले. श्रीमती तनुश्री आठवले यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्त्री शिक्षणाच्या कार्यावर आधारित स्वरचित कविता सादर केली.

नालंदा कुल मार्गदर्शक प्रा. बिजली दडपे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचे महत्त्व आपल्या भाषणामध्ये व्यक्त करत उपस्थितांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ. रमा भोसले यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांतून उपस्थित छात्राध्यापकांना प्रेरणा देत, आपल्या वक्तृत्वातून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमती सोनाली शिरसाठ यांनी सर्वांचं आभार मानले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नालंदा कुलाचे उपप्रमुख श्री. रोहन दत्तात्रेय भोईर यांनी केले. राष्ट्रगीताने या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.




महात्मा फुले पुण्यतिथी कार्यक्रमात नालंदा कुलाच्या समन्वयक व संयोजक मा. प्रा. बिजली दडपे मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांचे स्वागत करताना.




प्रथम वर्ष बी. एड छात्राध्यापिका कार्यक्रमाच्या संयोजक मा. प्रा. बिजली दडपे यांचे स्वागत करताना.




नालंदा कुलाच्या कार्यक्रम समन्वयक मा. प्रा. बिजली दडपे आपले मनोगत व्यक्त करताना.




मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले या अध्यक्षीय भाषण करताना.




महात्मा फुले पुण्यतिथी निमित्ताने स्वरचित कविता सादर करतात श्रीमती. तनुश्री आठवले.




सूत्रसंचालन करताना श्री. रोहन भोईर.